<u>महत्वाचे</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/०५/ कावि/५५४/२०१७
दिनांक :-३१/०७/२०१७

**विषय :- वस्तु व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीकामी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याबाबत...**

**संदर्भ :-**

**१. Central Goods and Service Tax Act, 2017**
**२. Integrated Goods and Service Tax Act 2017**
**३. Maharashtra Goods and Service Tax Act 2017**

**परिपत्रक,**

संदर्भिय विषयांन्वये १ जुलै २०१७ पासून वस्तु व सेवाकराची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वस्तु व सेवाकर कायद्याच्या कार्यपद्धती व अंमलबजावणी करिता महानगरपालिकेमध्ये जे ठेकेदार व पुरवठादार त्यांची सेवा देतात अशा सर्व ठेकेदार व पुरवठादार यांचे प्रशिक्षण ऑटो क्लस्टर, पिंपरी येथे दिनांक ०३/०८/२०१७ रोजी सकाळी ११:३० ते १:३० या कालावधीत आयोजित केलेले असून सदर प्रशिक्षणाकरिता सर्वांनी उपस्थित राहावे.

महानगरपालिकेचे कर सल्लागार श्री. सतिश नगरे यांचे प्रतिनिधी श्री. ऋतूराज चिंगळे व श्री. स्वरूप चिंगळे हे वस्तु व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीकामी प्रशिक्षण देणार आहेत. तरी सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्याकडे वस्तु व सेवा यांचा पुरवठा करणारे पुरवठादार व कामे करणारे कंत्राटदार यांना याबाबत अवगत करावे. व सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्याबाबत कळवावे ही विनंती.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रत :- १) मा. आयुक्त सो.
२) मा. अति. आयुक्त सो.
३) अध्यक्ष,
पिंपरी चिंचवड कॉनट्रक्टर असोसिएशन
पारिजात बन, सुदर्शन नगर,
गोलांडे श्रीराम मंदिर जवळ,
चिंचवड पुणे – ४११०३३.

प्रति :- १) सर्व संबंधित विभाग प्रमुख

२/- सदरचे परिपत्रक आपले विभागाचे नोटीस बोर्डवर दिसेल असे प्रसिद्ध करावे...